# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार
- छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार
- मानवी संवेदनेची व्याख्या बाबा आमटेंच्या कार्यातून पहायला मिळते – आनंदवनात मित्र मेळा कार्यक्रमाचा समारोप सत्रात मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

आणि

- दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडचं भारतासमोर ३०५ धावांचं आव्हान

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या सरस्वती भूवन प्रशालेचे विज्ञान शिक्षक मयुर साबळे यांनी या कार्यक्रमाचं महत्व या शब्दात विषद केलं.

***शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असताना या कार्यक्रमाचा प्रभाव मला आता जाणवतोय की पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांशी साधलेल्या या संवादामुळे निश्चितच विद्यार्थ्यांमधील ताणतणाव कमी होतोय. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या वर्षी या कार्यक्रमामध्ये जे एक्सपर्ट इनव्हॉल्व्ह केलेले आहेत, ते खरोखरच वाखाणण्याजोगं आहे.***

***खरोखरच विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांचादेखील विचार केलाय. भारतातल्या ज्या प्रमुख परीक्षा आहेत, त्या परीक्षांमधले जे टॉपर आहेत, ते विद्यार्थ्यांशी शेअर करणार आहेत. तर एकंदरीत खरोखरीच विद्यार्थ्यांच्या उत्कृष्टतेसाठी आणि ताणतणाव कमी करण्यासाठी हा उपक्रम खरोखरीच मला महत्वपूर्ण वाटतो.***

****

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षादल आणि नक्षलवाद्यांत झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले, तर दोन जवानांना वीरमरण आलं. चकमक झाली त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त केला आहे. बिजापूर इथल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातल्या जंगलात सुरक्षा दलानं आज सकाळी शोधमोहीम सुरू केली. ही मोहिम सुरू असताना नक्षलवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिलं. यात ३१ नक्षलवादी ठार झाले असल्याची माहिती बस्तरचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी दिली.

नक्षलमुक्त भारत बनवण्याच्या दिशेनं सुरक्षा दलांना बिजापूरमध्ये हे मोठं यश मिळाल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, देशाच्या इतर भागातही अशाच प्रकारे नक्षलवाद संपवण्याचा प्रयत्न सुरु असल्याचं सांगितलं.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री आतिशी यांनी आज नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. नव्या सरकारची स्थापना होईपर्यंत आतिशी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. दिल्ली विधानसभेच्या काल जाहीर झालेल्या निकालात भाजपाने जवळपास तीन दशकांनंतर जोरदार पुनरागमन करत ७० पैकी ४८ जागांवर विजय मिळवला, तर आम आदमी पक्षाला २२ जागांवर समाधान मानावं लागलं.

****

मानवी संवेदनेची व्याख्या बाबा आमटेंच्या कार्यातून पहायला मिळते, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. आज आनंदवनात मित्र मेळा कार्यक्रमाचा समारोप झाला, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पाशी जोडून घेण्यात

लोकांना आज आत्मिक समाधान मिळतं, ही बाब गेल्या ७५ वर्षांच्या वाटचालीचं फलित असल्याचं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलं, ते म्हणाले –

> ***मानवी संवेदना याची व्याख्या ही आपल्याला बाबांच्या कार्यामध्ये पाहायला मिळते. ज्या काळामध्ये बाबांनी हे काम सुरू केलं, समाजामध्ये मान्यता तर सोडाच पण एक प्रकारचा तिरस्कार, आज मला आनंद आहे की पंच्याहत्तर वर्षांनंतर याठिकाणी समाजातले अनेक प्रथितयश लोकं येतात, आणि या प्रकल्पाशी जोडून घेण्यामध्ये आज लोकांना एक आत्मिक समाधान मिळतं. किंबहुना आपण मोठे झालोत, अशा प्रकारची भावना निर्माण होतेय. पंच्याहत्तर वर्षांची ही जी वाटचाल आहे, ती खरोखर अत्यंत महत्वाची अशी वाटचाल आहे.***

बाबा आमटेंनी सुरू केलेल्या आनंदवन या प्रकल्पाला दहा कोटींरुपयांचा विशेष निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२७ पर्यंत देश कुष्ठरोगमुक्त करण्याचं ठरवलं असून, आनंदवनसारख्या समाजसेवी संघटनांच्या मदतीनेच हे साध्य करता येईल, असं ते म्हणाले. कुष्ठरोग्यांची संख्या लक्षणीयरित्या घटली असली तरी मोठ्या प्रमाणावर अजून कार्य करायचं बाकी आहे, असं नमूद करत, आनंदवनात पाचशे जणांसाठी निवासी रुग्णकेंद्र, उभारण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. रुग्णालयाला देण्यात येणारं अनुदान प्रतिरुग्ण २२०० वरुन ६ हजार पर्यंत तर पुनर्वसनासाठीचंही अनुदान दोन हजार पासून ६ हजार पर्यंत वाढवल्याचंही त्यांनी सांगितलं.

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्यावहिल्या कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. त्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करणार असून, अक्षयावत आणि बडे हनुमान मंदीरालाही भेट देणार आहेत. डिजिटल महाकुंभा केंद्रातून त्या कुंभमेळ्याची पाहणी देखील करणार आहेत.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा प्राथमिक परीक्षा २०२५ साठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत येत्या १८ फेब्रुवारीपर्यंत वाढवली आहे. याशिवाय, अर्जात काही बदल असल्यास त्यात दुरुस्ती करण्याची मुदत १९ ते २५ फेब्रुवारी पर्यंत असणार आहे. यापूर्वी परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची शेवटची तारीख ११ फेब्रुवारी होती. केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे दरवर्षी नागरी सेवा परीक्षा, प्राथमिक, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीन टप्प्यांत घेतली जाते.

****

ओडिशातल्या कटक इथं सुरु असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडनं भारताला ३०५ धावांचं आव्हान दिलं आहे. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडचा संघ एकच चेंडू शिल्लक असताना ३०४ धावांवर सर्वबाद झाला. भारताकडून रविंद्र जडेजानं तीन, तर मोहम्मद शमी, हर्षित राणा, हार्दिक पंड्या, आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या बिनबाद तीस धावा झाल्या होत्या.

****

उत्तराखंडमध्ये सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत महाराष्ट्रानं आतापर्यंत ११५ पदकांची कमाई करत तिसरं स्थान कायम ठेवलं आहे. यामध्ये २७ सुवर्ण, ४२ रौप्य आणि ४६ कांस्य पदकांचा समावेश आहे. सर्वाधिक ४२ सुवर्ण पदकं जिंकून सेना दल पहिल्या, तर ३१ सुवर्ण पदकं जिंकून कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे.

****

मुंबई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत आज प्रार्थना थुंबारे आणि एरियन हार्टोनो यांच्या जोडीचा सामना रशियाच्या अमिना अंशबा आणि एलेना प्रिडांकिना या जोडीशी होणार आहे. प्रार्थना आणि अरियाना या भारत-डच जोडीनं सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताच्या माया राजेश्वरनचं आव्हान संपुष्टात आलं.

****

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासन कटिबद्ध असून, त्यादृष्टीने सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही, मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. नांदेड जिल्ह्याच्या बिलोली तालुक्यात सगरोळी इथं आज राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या

उद्घाटन सत्रात आभासी पद्धतीनं ते संबोधित करत होते. प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाला आमदार जितेश अंतापुरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रमोद देशमुख, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी, साहित्यिक देविदास फुलारी यांच्यासह अनेक मान्यवर साहित्य रसिक उपस्थित होते.

****

लातूर शहराजवळच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या कीर्ती ऑइल मिलला काल मध्यरात्री भीषण आग लागली. बारदाण्याच्या गोडाऊनला ही लागली असून, संपूर्ण बारदाने जळून खाक झाले आहेत. अग्निशमन दलाच्या सहा बंबाच्या मदतीने आग आटोक्यात आणली. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

****

नाशिक इथल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातल्या कृषि विज्ञान केंद्रामध्ये सात दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मधमाशी आणि मध अभियानाअंतर्गत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलं होतं. दिवसेंदिवस पिकांमध्ये परागीभवन न होण्याची गंभीर होत असलेली समस्या, परागीभवना अभावी कमी होत असलेली उत्पादकता, रासायनिक कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे मधुमक्षिका पालनात येणाऱ्या अडचणी, मधुमक्षिकांबाबत असणारे गैरसमज, असे अनेक महत्वाचे विषय यात हाताळण्यात आले. विविध जिल्ह्यांतले २५ शेतकरी, उद्योजक आणि ग्रामीण युवक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते.

****

बिलाच्या थकबाकीमुळे वीज जोडणी कायमस्वरूपी तोडलेल्या राज्यातल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांना महावितरणच्या अभय योजनेत व्याज आणि दंड माफीचा लाभ घेण्यासाठी आता केवळ ५० दिवस उरले आहेत. येत्या ३१ मार्चला योजनेची मुदत संपणार असून, ग्राहकांनी वीजबिल थकबाकी भरून सवलत मिळवावी तसंच कायदेशीर कारवाईची नामुष्की टाळावी, असं आवाहन छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केलं आहे. आतापर्यंत छत्रपती संभाजीनगर परिमंडतल्या सहा हजार ५८४ ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून, त्यांच्याकडून सहा कोटी ७१ लाख रुपयांचा भरणा

झाला आहे. या ग्राहकांना सात कोटी ५२ लाख रुपयांचं व्याज आणि विलंब आकार माफ झाला आहे.

****